आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

२४ सप्टेंबर २०२४ -मंगळवार

**ठळक बातम्या**

- अमेरिकेचा तीन दिवसांचा दौरा पूर्ण करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मायदेशात दाखल

- कवच यंत्रणेची चौथी आवृत्ती डिसेंबर २०३० पर्यंत देशभरात लागू करण्याचं उद्दिष्ट

- बदलापूर अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यू प्रकरणाची सीआयडी चौकशी सुरू

- जम्मू - काश्मिरमध्ये उद्या विधानसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या टप्प्यातलं मतदान

**आणि**

- श्रीलंकेच्या प्रधानमंत्रीपदी हरिणी अमरसुर्या यांचा शपथविधी

**<><><><><>**

अमेरिकेचा तीन दिवसांचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले. या दौऱ्यात डेलावेआर इथं क्वाड परिषदेत ते सहभागी झाले, तसंच न्यूयॉर्कमधे संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत भविष्यातलं जग या विषयावरच्या परिषदेत त्यांचं भाषण झालं. अमेरिकेतल्या भारतीय समुदायानं आयोजित केलेल्या कार्यक्रमातही ते सहभागी झाले होते.

क्वाड परिषदेत प्रधानमंत्र्यांनी क्वाड गटाची उपयुक्तता अधोरेखित केली. मुक्त, खुल्या, सर्वसमावेशक आणि समृद्ध इंडो पॅसिफिक प्रदेशासाठी क्वाड वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांची डेलावेर इथं भेट घेतली. यावेळी दोन्ही देशात दोन करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यानंतर मोदी यांनी जपानचे प्रधानमंत्री फुमियो किशिदा आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिज यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली.

दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी प्रधानमंत्र्यांनी न्यूयॉर्कमध्ये भारतीय अमेरिकन समूदायाला संबोधित केलं. त्यानंतर त्यांनी तंत्रज्ञान उद्योगातल्या उच्चपदस्थांशी संवाद साधला. त्याच दिवशी मोदी यांनी नेपाळचे प्रधानमंत्री के. पी. शर्मा ओली, कुवेतचे राजपुत्र शेख सबाह खालेद अल हमाद अल सबाह आणि पॅलेस्टिनचे राष्ट्राध्यक्ष महमूद अब्बास यांच्याशी चर्चा केली. तसंच युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की आणि व्हिएतनामच्या कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस तो लिम यांच्याशीही द्विपक्षीय चर्चा केली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज नवी दिल्लीत एशियन ऑर्गनायझेशन ऑफ सुप्रीम ऑडिट इन्स्टिटट्यूशन्स च्या १६व्या परिषदेचं उद्घाटन केलं. भारताच्या सीएजी यांची देशाच्या सार्वजनिक वित्तव्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्त्व सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं. भारतीय संविधानानं कॅग कार्यालयाला व्यापक अधिकार आणि संपूर्ण स्वायत्तता प्रदान केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

कवच या स्वयंचलित रेल्वे सुरक्षा यंत्रणेची चौथी आवृत्ती डिसेंबर २०३० पर्यंत संपूर्ण देशभरात लागू केली जाईल, असं उद्दिष्ट ठरवल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. देशात सर्वप्रथम कोटा ते सवाई माधोपूर मार्गावर ही यंत्रणा लावलेली आहे. त्याची पाहणी करण्यापूर्वी ते जयपूरमध्ये वार्ताहरांशी बोलत होते. १० हजार रेल्वे इंजिन आणि ९ हजार किलोमीटरच्या रेल्वे मार्गावर लवकरच ही यंत्रणा लावली जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

बदलापूर अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी सीआयडी अर्थात गुन्हे अन्वेषण विभागानं सुरू केली आहे. याप्रकरणी सीआयडीच्या पथकानं मुंब्रा आणि ठाणे पोलिस स्थानकाला भेट दिली. याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद मुंब्रा पोलिसांनी केली आहे. भारतीय न्याय संहिता आणि शस्त्रास्त्र कायदाच्या अंतर्गत पोलिसांनी स्वतंत्र तक्रारींची नोंद केली आहे. सहायक पोलीस निरीक्षक निलेश मोरे यांची बंदूक हिसकावून अक्षय शिंदेनं गोळीबार केला होता. दरम्यान, जे जे रुग्णालयात आज त्याच शवविच्छेदन झालं.

<><><><><>

शाळांमधे लहान मुलांच्या सुरक्षेसाठी केंद्रसरकारनं दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले. बदलापूर प्रकरणी एका सेवाभावी संस्थेनं दाखल

केलेल्या याचिकेवर आज न्यायमूर्ती बी व्ही नागरत्न आणि न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंग यांच्या पीठापुढं सुनावणी झाली. फक्त पाच राज्यांनी केंद्रसरकारच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी केली असल्याचं याचिकाकर्त्यांच्या वकीलानं न्यायालयाला सांगितलं. राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगानं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांची समन्वय राखावा, आणि या मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीची देखरेख करावी, अशा सूचना न्यायालयानं दिल्या.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विविध तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत ही मंजूरी देण्यात आली. यात पंढरपूरमधे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात भाविक आणि पर्यटकांसाठी दर्शन मंडप आणि दर्शन रांगेची सुविधा निर्माण करण्यासाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

या तीर्थस्थळं आणि पर्यटनस्थळांच्या विकासासाठी तातडीनं नियोजन करावं, या सर्व ठिकाणची कामं दर्जेदार होतील याची काळजी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

**<><><><><>**

जम्मू - काश्मिरमध्ये उद्या विधानसभेच्या निवडणुकीचं दुसऱ्या टप्प्यातलं मतदान होणार आहे. २६ मतदारसंघांमध्ये यासाठी साडे ३ हजार मतदान

केंद्र उभारली आहेत. त्यासाठी १३ हजारांहून अधिक कर्मचारी मतदान केंद्रांवर आज रवाना झाले. या सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची सुविधा उपलब्ध आहे. जम्मू-काश्मिरमध्ये पहिल्या टप्प्यात १८ तारखेला मतदान झालं होतं. शेवटच्या टप्प्यात १ ऑक्टोबरला मतदान झाल्यावर ८ ऑक्टोबरला मतमोजणी होईल.

**<><><><><>**

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, तसंच निवडणुक आयुक्त ग्यानेश कुमार आणि डॉ एस. एस. संधू यांनी आज रांचीमधे झारखंड विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. निवडणुकीत धनशक्तीचा वापर खपवून घेतला जाणार नाही,असं निवडणुक आयोगानं यावेळी राज्यातल्या तसंच केंद्रीय यं ्त्रणांना बजावलं. आयोगानं आज राजकीय पक्ष, सुरक्षा यंत्रणा आणि इतर संबधितांच्या बैठका घेतल्या. निवडणुका प्रलोभनमुक्त व्हाव्यात, याची काळजी घेण्याचे निर्देश संबधित यंत्रणांना दिले असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्तांनी बातमीदारांना सांगितलं. निवडणुकी दरम्यान, तपासणीच्या नावाखाली लोकांना उगाच त्रास होऊ नये, याची काळजी घेण्याचे निर्देश आयोगानं अधिकाऱ्यांना दिले आहेत. पश्चिम बंगाल, ओदिशा, झारखंड आणि बिहारलगतच्या सीमांवर विशेष लक्ष देण्याचे निर्देशही आयोगानं दिले आहेत.

**<><><><><>**

मैसूर नगर विकास प्राधिकरण घोटाळा प्रकरणी खटला चालवण्याच्या राज्यपालांच्या परवानगीला आव्हान देणारी याचिका कर्नाटक उच्च

न्यायालयानं आज फेटाळली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर आज न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली. राज्यपाल आपला निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकतात तसंच, मुख्यमंत्र्यांवर खटला चालवण्याचा निर्णय विचार न करता घेतलेला नाही, असं न्यायालयानं यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

यंदाचा इफ्फी अर्थात भारताच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या तयारीचा आढावा आज माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी पणजीत घेतला. यावेळी स्थानिक अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांची भेट घेतली. यंदाचा इफ्फी २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे.

**<><><><><>**

ज्ञानराधा बहुराज्य सहकारी पतसंस्था घोटाळाप्रकरणी ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज ८५ कोटी ८८ लाख रुपये किंमतीच्या स्थावर मालमत्तांवर टाच आणली. मुंबई, पुणे औरंगाबाद आणि बीड जिल्ह्यातल्या निवासी सदनिका, व्यावसायिक कार्यालयांच्या जागा, आणि भूखंडाचा त्यात समावेश आहे. आतापर्यंत याप्रकरणी ९५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या मालमत्तांवर जप्ती किंवा टाच आणली आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेचे नवीन प्रधानमंत्री म्हणून हरिणी अमरसुर्या यांनी आज शपथ घेतली. नॅशनल पीपल्स पॉवरच्या खासदार असलेल्या अमरसुर्या यांनी आज राष्ट्रपती

सचिवालयात राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांच्यासमोर शपथ घेतली. दिसानायके यांनी कालच राष्ट्रपतीपदाची शपथ घेतली होती. एनपीपीचे खासदार विजित हेरथ आणि लक्ष्मण निपुण अराची यांनीही कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली.

**<><><><><>**

इस्रायलने लेबनॉनमधल्या हिजबुल्लांच्या ठिकाणांवर केलेल्या हवाई हल्ल्यातल्या मृतांची संख्या ५५८ वर पोहचली आहे. इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यात कालपासून सुरु असलेल्या संघर्षात आतापर्यंत अठराशे ३५ लोक जखमी झाल्याची माहिती लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

भारतीय तटरक्षक दल ही देशाची पहिली संरक्षण फळी असून देशाच्या विशाल किनारपट्टीचं, तसंच विशेष आर्थिक प्रदेशाचं संरक्षण करण्याची महत्त्वाची जबाबदारी तटरक्षक दल पार पाडतं, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नवी दिल्ली इथं केलं आहे. भारतीय तटरक्षक दल कमांडर्सच्या ४१व्या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**<><><><><>**

शाश्वत, सर्वसमावेशक विकासामध्ये विधान मंडळांची भूमिका तसंच, विधानसभेचं डिजिटायझेशन, आमदारांची क्षमता बांधणी या◌ॉविषयी दहाव्या कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन इंडिया रिजन्स परिषदेत चर्चा झाल्याची माहिती लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज नवी दिल्ली इथं दिली.

दहाव्या कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या दोन दिवसीय परिषदेनंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

**<><><><><>**

भारतीय महिला संघाने बुडापेस्ट इथं नुकत्याच झालेल्या बुद्धिबळ ऑलिंपिक स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकलं. या संघाचे मार्गदर्शक असणारे पुण्याचे ग्रँडमस्टर अभिजित कुंटे यांचं आज विमानतळावर जल्लोषात स्वागत करण्यात आलं.

**<><><><><>**

नैऋत्य मौसमी पावसाचा परतीचा प्रवास कालपासून देशात सुरू झाला आहे. आतापर्यंत राजस्थान, हरियाणा आणि गुजरातच्या काही भागातून हा पाऊस माघारी गेला आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात राज्यातून हा पाऊस पूर्ण माघार घेईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**